REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 10 | JULY - 2025

# मराठी संत साहित्यातील चिरंतन मूल्य

**सौ. करुणा विजयकुमार गुरव**
**(MA B.Ed SET & NET in Marathi)**
**जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा दोडयाळ.**

**प्रस्तावना :-**



मूल्य ही शिकवली जात नाही तर ती वर्तनातून आत्मसात केली जातात.अशीच चिरंतन मूल्ये संतांनी जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करत स्वतःच्या वर्तनातून लोकापर्यंत पोहोचवली आहेत.चिरंतन म्हणजेच शाश्वत.. कधीही नष्ट न होणारी. ही चिरंतन मूल्ये मराठी साहित्यात प्रकर्षणाने आढळून येतात. मराठी संत साहित्य हे भारतीय संस्कृतीचे अनमोल लेणे आहे. हे संत साहित्य केवळ भक्तीरसाने ओथंबलेली वाड्मय शैली नसून त्यात समाज प्रबोधनाचे अमूल्य तत्त्वज्ञानही आहे. या मराठी संत साहित्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक , अध्यात्मिक आणि सामाजिक जडणघडणीत मूल्यांचा प्रचार केला आहे. या साहित्याने समाजाला दिशा दिली आणि मूल्याधारित जीवनशैलीचा आदर्श घालून दिला आहे. यातील चिरंतन मूल्ये कोणती हे अभ्यासाने जाणून घेणे अत्यावश्यक वाटते.

**मानवतावाद:-** संत साहित्यातील सर्वात महत्त्वाचे मूल्य म्हणजे मानवतावाद होय. संत नामदेव,संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम यांनी आपल्या अभंगाद्वारे मानवतावाद सांगितला आहे.

संत तुकाराम म्हणतात,"

जे का रंजले गांजले | त्यासी म्हणे जो आपुले || तोचि साधू ओळखावा | देव तेथेचि जाणावा || " या ठिकाणी रंजले गांजले चा अर्थ आहे त्रासलेला चिंतानी ,ग्रासलेला कुठल्या न कुठल्या विकाराने पिडित व्यक्ती वा मनुष्य. अशा , कष्टी-दुःखी , रंजल्या गांजल्यांना जे आपलेसे करतात , त्यांच्या दुःखावरून मायेचा हात फिरवतात , आधार देतात , माणसांसारखे वागवतात तेच खरे साधू आणि अशाच माणसांच्या ठायी भगवंत असतो. आजच्या माणसात माणूसपण हरवलेल्या जगात हे मानवतावादाचे मूल्य कस्तुरी मृगासारखे चिरंतन टिकून राहिले आहे* यासाठीच या संतांनी.'वसुधैव कुटुंबकम* हा संदेश देत जाती.धर्माच्या पलीकडे जाऊन माणसा माणसांमध्येच प्रेमाची भावना निर्माण केली आहे-

**समता व सामाजिक न्याय:-**

संत तुकारामांनी , " सर्व चराचरी भूतें | तोचि संजीव महान ||" याचाच अर्थ परमेश्वर सर्वत्र आहे मग भेदभाव कशाला? असे म्हणत अन्यायाला वाचा फोडली आहे.

संत तुकाराम म्हणतात, "जेथे जातीचा भेद नाही , तिथे शरण घेतो राम." जातीवादाच्या पलीकडे जाऊन एकतेचे महत्व या अभंगातून प्रतीत होते. एकता/समता हे सर्वश्रेष्ठ मानवी मूल्ये आहेत. माणसाला माणूसपण मिळवून देणारे मूल्य म्हणजेच समता होय.

म्हणूनच संत नामदेव म्हणतात , "सर्वांभूती समदृष्टी हेचि भक्ती गोमटी|" ही समता प्रस्थापित करण्यासाठी संत नामदेव आग्रह धरतात. "शुद्ध करी मन , समता धरी ध्यान , तरीच बंधन तुटेल रे ||" म्हणूनच आजही हे मूल्य चिरंतन राहिले आहे.

**प्रामाणिकपणा :-**

संत तुकाराम म्हणतात, "बोले तैसा चाले | त्याची वंदिन पाऊले || अंगे झाडीन अंगण | त्याचे दास्यत्व करीन ||" याचाच अर्थ जो बोलेल तसाच वागेल त्याचे मी चरण वंदितो. त्याचे अंगण मी हाताने झाडीन असे म्हणत शेवटी संत तुकाराम म्हणतात बोलतो तसं वागतो तोच खरा देव. इतकं प्रामाणिकपणाला सर्वोच्च स्थान आहे. काळ कोणताही असला तरी प्रामाणिकपणा हे मूल्य त्रिकालबाधित आहे.

पुढे संत तुकाराम असेही म्हणतात , "सत्य असत्याशी मन केले ग्वाही , मानियाले नाही बहुमता." म्हणजेच सत्य आणि असत्य याची खात्री झाल्याशिवाय कुठल्याही गोष्टीवर विश्वास ठेवू नये. अशा प्रकारे संतांनी महाराष्ट्राला सुसंस्कृत करण्याचेच काम केले आहे.

**सत्य:-**

सत्य हे संत साहित्यातील एक मूलभूत मूल्य आहे. संतांनी खोटेपणा , ढोंग , अंधश्रद्धा याचा निषेध केला आहे.सत्य हे पवित्र आणि सार्वभौम आहे. संत तुकाराम म्हणतात, "सत्याचे एक चंद्र , बाकी सारे छायांचे मणी." म्हणजेच सत्यच सर्वश्रेष्ठ आहे. सत्यासाठी त्याग ,बलिदान करणं ही संतांची शिकवण आहे.

संत तुकाराम म्हणतात, "सत्य संकल्पाचा दाता नारायण | सर्व करी पूर्ण मनोरथ ||" कोणत्याही प्रकारचा सत्यसंकल्प आपण केले तर ते पूर्णत्वास जाण्यासाठी तो नारायण प्रयत्न करतो. संत तुकाराम असेही म्हणतात , "सत्याची गोडी | तुजविण काही नाही गोडी ||" अशा प्रकारे सत्याला सर्वोच्च स्थान आहे.

**प्रेम:-**

संतांचे प्रमुख मूल्य म्हणजे प्रेम. सर्व संतांनी प्रेमाला सर्वोच्च स्थान दिले आहे. सार्थ तुकाराम गाथेत संत तुकाराम म्हणतात , "प्रेम देवाचे देणे | देहभाव जाय जेणें | न धरावी मने | शुद्धी देश काळाची ||" म्हणजेच प्रेम देवाचे देणे आहे आणि प्रेमानेच माणसाचा देहभाव नाहीसा होतो.

पुढे ते असेही म्हणतात , "प्रेम नये सांगता बोलता दाविता | अनुभव चित्ता चित्त जाणे ||" म्हणजेच श्रीहरीचे प्रेम कसे असते, कोणत्या पद्धतीचे असते हे त्यांच्या भक्ताला कधीही सांगता किंवा बोलून दाखविता येत नाही. त्याचा फक्त चित्ताला अनुभव घेता येतो. इतकं सुंदर नितांत निर्मळ असे हे प्रेमाचे मूल्य. म्हणून प्रत्येकाला समान प्रेम ,दया , करूणा दाखवली पाहिजे .कारण सर्व प्राणीमात्रांमध्ये , व्यक्तींमध्ये परमेश्वर वास करत आहे . आजही हे मूल्य चिरंतन पदोपदी आपल्याला जाणवत आहे .

**कर्मयोग व कर्तव्यपालन :-**

संतांच्या जीवनात एक महत्त्वपूर्ण घटक होता कर्मयोग. भगवद्गीतेच्या *कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन* या श्लोकात कर्मयोगाविषयी नितांत सुंदर विवेचन दिलेले आहे.

संत ज्ञानेश्वर ज्ञानेश्वरी च्या तिसऱ्या अध्यायात म्हणतात, " तरी उचितें कर्म आघवी | तुवा आचरोनि मज अर्पावे || परि चित्तवृत्ती न्यासावी | आत्मरूपी ||" म्हणजेच सर्व विहित कर्मे करून ती मला तू अर्पण कर. परंतु चित्तवृत्ती मात्र आत्मस्वरूपी ठेव. या ओवीतून संत ज्ञानेश्वर कर्मयोगाचे सार सांगतात.

संत रामदास स्वामींच्या शिकवणीत कर्मयोगाचे महत्त्व दिसून येते. ते म्हणतात, "कर्म कर , त्याचं फळ ईश्वरावर सोपव." याचाच अर्थ फळाची चिंता न करणे हे कर्मयोगाचे मुख्य तत्व आहे.

**संतोष आणि शांती –**

संतांचे जीवन अधिक सुखी असण्याचे कारण म्हणजे त्यांची समर्पण भावना आणि संतोष होय. लोभ , मोह , क्रोध यांना बाजूला ठेवून शांत जीवन जगावे असा संदेश संतांनी दिला. एवढेच काय तर संत ज्ञानेश्वरांनी *"पसायदान"* मधून विश्वशांतीची , विश्वकल्याणाची मागणी केली.

तर संत तुकाराम म्हणतात , "दया , क्षमा , शांती | तेथे देवाची वसति ||" म्हणजेच जिथे दया , क्षमा , शांती असते तिथेच देव राहतो.

पुढे संत तुकाराम असेही म्हणतात , "शांती परतें नाही सुख , येर अवघेंची दुःख" म्हणजेच चित्तात शांती असेल तरच सुख प्राप्त होते नाही तर बाकी सर्वत्र दुःखच आहे. संत साहित्यात शांती व संतोष यावर अनेक संतांनी अभंग रचून ते मूल्य आज प्रत्येकाच्या मनामनात रुजवले आहे.

**भक्ती आणि साधनेचे महत्त्व :-**

संत साहित्य भक्तीरसाने ओथंबलेले असलं तरी त्यात भक्तीमार्गाने साधनेसाठी ही अनंत महत्व दिलं आहे. संताने सांगितले की ईश्वराची उपासना साधनेच्या माध्यमातून केली पाहिजे.

संत नामदेव सांगतात , "नामस्मरण करा आणि जीवनाच्या प्रत्येक क्षणात परमेश्वराची एकरूप व्हा." भक्तीचा अवलंब केल्याने मनशांती , चित्तशांती व आरोग्यमय निर्मळ जीवन लाभते. संत तुकाराम यांनी ज्ञान , भक्ती आणि वैराग्य यांचे महत्त्व पटवून दिले.संत तुकाराम म्हणतात, "अभंग हाचि मज ठावो | हरिपाठ माझा गहिवरला ||"

**निष्कर्ष :-**

मराठी संत साहित्य हे केवळ एक धार्मिक साहित्य नव्हे तर समाजहित साधणारे आणि मानवी मूल्यांची जपणूक करणारे विचारधन आहे. यातून प्रेम , समता , सत्य , शांती , कर्मयोग , भक्ती , तत्त्वज्ञान हि चिरंतन मूल्ये टिकून आहेत.आजच्या तंत्रयुगातही हे मूल्य चिरंतन उपयोगी पडणारी आहेत. या मूल्यांच्या आधारे माणूस स्वतःचे जीवन अधिक समृद्ध , सुखदायी करून घेत आहे.

**संतवाणी ही नुसती शिकवण नाही तर ती जीवन जगण्याचा खरा मार्ग आहे.**